RNI No. MAHBIL /2009/35527

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–क

वर्ष ४, अंक ५६] शुक्रवार, सप्टेंबर २१, २०१८/भाद्रपद ३०, शके १९४० [पृष्ठे ५, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ८२**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाव्यतिरिक्त इतर वैधानिक प्राधिका-यांनी तयार केलेले (भाग एक, एक-अ व एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले वैधानिक नियम व आदेश यांव्यतिरिक्त इतर) वैधानिक नियम व आदेश ; यात भारत सरकार, उच्च न्यायालय, पोलीस आयुक्त, आयुक्त (राज्य उत्पादन शुल्क), जिल्हादंडाधिकारी व निवडणूक आयोग, निवडणूक न्यायाधिकरण, निवडणूक निर्णय अधिकारी व निवडणूक आयोगाखालील इतर प्राधिकारी यांनी तयार केलेले वैधानिक नियम व आदेश यांचा समावेश होतो.**

**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग**

**१३ वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र,**
**कफ परेड, कुलाबा, मुंबई ४०० ००५.**

**अधिसूचना**

**विद्युत अधिनियम, २००३.**

क्र. मविनिआ/तांत्रिक/परवाना अटी/जीईपीएल/२०१८/१९४.—विद्युत अधिनियम, २००३ चे कलम १८१ आणि या संबंधात त्यास समर्थ करणा-या अन्य सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग याद्वारे ‘महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (मे. गिगाप्लेक्स इस्टेट प्रा. लि. च्या ऐरोली नॉलेज पार्क, टीटीसी इंडस्ट्रीयल एरिया, ऐरोली, जिल्हा ठाणे, येथील माहिती तंत्रज्ञान/माहिती तंत्रज्ञानावर आधारित सेवा विषयक विशेष आर्थिक क्षेत्राला (आयटी/आयटीइएस एसईझेड) लागू असलेल्या वीज वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी) विनियम, २०१५’, (‘मुख्य विनियम’) या विनियमांमध्ये सुधारणा करण्यासाठी खालील विनियम करीत आहे :—

**१. संक्षिप्त नाव, व्याप्ती आणि प्रारंभ :—**(१) या विनियमांना ‘महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (मे. गिगाप्लेक्स इस्टेट प्रा. लि. च्या ऐरोली नॉलेज पार्क, टीटीसी इंडस्ट्रीयल एरिया, ऐरोली, जिल्हा ठाणे, येथील माहिती तंत्रज्ञान/माहिती तंत्रज्ञानावर आधारित सेवा विषयक विशेष आर्थिक क्षेत्राला (आयटी/आयटीइएस एसईझेड) लागू असलेल्या वीज वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी) (दुसरी सुधारणा) विनियम, २०१८’ म्हणावे.

(२) हे विनियम **शासकीय राजपत्रात** ज्या दिनांकास प्रसिद्ध होतील त्या दिनांकापासून अंमलात येतील.

**२. मुख्य विनियमांच्या विनियम १(२) मध्ये सुधारणा** :—मुख्य विनियमांमधील विनियम १ (२) खालीलप्रमाणे बदलण्यात येईल, जसे की —

“हे विनियम भारत सरकार, वाणिज्यिक आणि उद्योग मंत्रालय, वाणिज्यिक विभाग (विशेष आर्थिक क्षेत्र कक्ष), यांच्या दिनांक ११ जून २०१३ च्या एसईझेड अधिसूचना क्र. एस.ओ. १६९५ (ई) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या क्षेत्रासाठी आणि दिनांक १८ फेब्रुवारी २०१५ च्या एसईझेड

अधिसूचना क्र. एस.ओ. ५९५ (ई) आणि दिनांक ३० ऑक्टोबर २०१७ च्या एसईझेड अधिसूचना क्र. एस.ओ. (ई) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अतिरिक्त क्षेत्रासाठी लागू राहतील. ”

३. मुख्य विनियमांच्या विनियम ४.१ मध्ये सुधारणा.-मुख्य विनियमांमधील विनियम ४.१ खालीलप्रमाणे बदलण्यात येईल, जसे की :—

“ मानीव वितरण परवानाधारकाने विजेचा पुरवठा करण्यासाठी प्राधिकृत करण्यात आलेले वीज पुरवठ्याचे क्षेत्र हे भारत सरकारच्या वाणिज्यिक आणि उद्योग मंत्रालय (वाणिज्यिक विभाग) यांनी, विशेष आर्थिक क्षेत्र अधिनियम, २००५ च्या कलम ४ अंतर्गत निर्गमित केलेल्या एसईझेड अधिसूचना क्र. एस.ओ. १६९५ (ई), दिनांक ११ जून २०१३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे, तसेच त्यानंतरची एसईझेड अधिसूचना क्र. एस.ओ. ५९५(ई), दिनांक १८ फेब्रुवारी २०१५ आणि दिनांक ३० ऑक्टोबर २०१७ च्या एसईझेड अधिसूचना क्र. एस.ओ. (ई) अन्वये सुधारित केल्यानुसार, प्लॉट क्र. आयटी-५, ऐरोली नॉलेज पार्क, टीटीसी इंडस्ट्रीयल एरिया, ऐरोली, जिल्हा ठाणे, येथील १६.५२ हेक्टर्सचे संपूर्ण क्षेत्र राहील. हे क्षेत्र सदर अधिसूचनांमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अशा अटी आणि वगळण्यात आलेल्या बाबी यांच्या अधीन राहून असेल आणि ते सोबतच्या अनुसूची १ मधील सुधारित नकाशामध्ये अधिक तपशीलासह आरेखित केल्यानुसार राहील.”

**अभिजीत देशपांडे,**

मुंबई,
दिनांक २० सप्टेंबर २०१८.

सचिव,
महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग.

---

**सूचना.——** ‘महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (मे. गिगाप्लेक्स इस्टेट प्रा. लि. च्या ऐरोली नॉलेज पार्क, टीटीसी इंडस्ट्रीयल एरिया, ऐरोली, जिल्हा ठाणे, येथील माहिती तंत्रज्ञान/माहिती तंत्रज्ञानावर आधारित सेवा विषयक विशेष आर्थिक क्षेत्राला (आयटी/आयटीइएस एसईझेड) लागू असलेल्या वीज वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी) विनियम, २०१५’, **शासकीय राजपत्रात** दिनांक २३ डिसेंबर २०१५ रोजी अधिसूचित करण्यात आले होते. या विनियमांमध्ये पुढे, ‘महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (मे. गिगाप्लेक्स इस्टेट प्रा. लि. च्या ऐरोली नॉलेज पार्क, टीटीसी इंडस्ट्रीयल एरिया, ऐरोली, जिल्हा ठाणे, येथील माहिती तंत्रज्ञान/माहिती तंत्रज्ञानावर आधारित सेवा विषयक विशेष आर्थिक क्षेत्राला (आयटी/आयटीइएस एसईझेड) लागू असलेल्या वीज वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी) (पहिली सुधारणा) विनियम, २०१७’ द्वारा दिनांक ३ फेब्रुवारी २०१७ रोजी सुधारणा करण्यात आली.

## अनुसूची १


DEMARCATION MAP OF IT/ ITES SEZ BEING DEVELOPED BY M/S GIGAPLEX ESTATE PVT.LTD.
AREA STATEMENT
TOTAL AREA OF SEZ IS 16.52 HECTARES BOUNDED IN RED
PROCESSING AREA IS 16.52 HECTARES SHOWN THUS
NON PROCESSING AREA IS 0.00 HECTARES
PLOT BOUNDARY
SEZ
PLOT BOUNDARY
BLOCK PLAN
प्रफुल्ल उमरे
सहायक विकास आयुक्त
सीप्झ-सेझ-मुंबई.
Pravina Surve
B. Arch
Reg. No. CA/87/10700
S.E.Z. PLOT BOUNDARY FOR PLOT NO.I.T. 5 AIROLI KNOWLEDGE PARK,TTC INDUSTRIAL AREA ,
VILLAGE AIROLI & DIGHE , DIST. THANE, MAHARASHTRA STATE.
N
NOTES:
* BOUNDARIES SHOWN IN BLOCK PLAN BASED ON LAYOUT PLAN APPROVED BY MIDC.
* AREAS ARE SUBJECT TO SURVEY & DEMARCATION ON SITE.

## MAHARASHTRA ELECTRICITY REGULATORY COMMISSION

13th Floor, Centre No.1, World Trade Centre, Cuffe Parade, Mumbai 400 005.

*NOTIFICATION*

ELECTRICITY ACT, 2003.

No. MERC/TEC/Licence Conditions/GEPL/2018/194.—In exercise of the powers conferred under Section 181 of the Electricity Act, 2003 and all other powers enabling it in this behalf, the Maharashtra Electricity Regulatory Commission hereby makes the following Regulations to amend the Maharashtra Electricity Regulatory Commission (Specific Conditions of Distribution Licence applicable to M/s. Gigaplex Estate Pvt. Ltd. for IT and ITES SEZ at Airoli Knowledge Park, TTC Industrial Area, Airoli, Dist. Thane) Regulations, 2015 (' the principal Regulations '), namely :—

1. *Short title and commencement* : —(1) These Regulations may be called the Maharashtra Electricity Regulatory Commission (Specific Conditions of Distribution Licence applicable to M/s. Gigaplex Estate Pvt. Ltd. for IT & ITES SEZ at Airoli Knowledge Park, TTC Industrial Area, Airoli, Dist. Thane) (Second Amendment) Regulations, 2018.

(2) These Regulations shall come into force from the date of their publication in the *Official Gazette.*

2. *Amendment of Regulation 1(2) of the principal Regulations* :—Regulation 1(2) of the principal Regulations shall be substituted by the following, namely :—

"These Regulations shall extend to the area specified in the SEZ Notification No. S.O. 1695 (E) dated 11th June 2013 and the additional area specified in the SEZ Notification No. S.O. 595 (E) dated 18th February 2015 and SEZ Notification No. S.O. (E) dated 30th October 2017 issued by Government of India, Ministry of Commerce and Industry, Department of Commerce (SEZ Section). "

3. *Amendment of Regulation 4.1 of the principal Regulations* :—Regulation 4.1 of the principal Regulations shall be substituted by the following, namely :—

"The Area of Supply within which the Deemed Distribution Licensee is authorized to supply electricity shall be the whole of the area of 16.52 Hectares at Plot No. IT-5, Airoli Knowledge Park, TTC Industrial Area, Airoli, Dist. Thane, as stated in the SEZ Notification No. S.O. 1695 (E) dated 11th June 2013 as subsequently revised *vide* SEZ Notification No. S.O. 595 (E) dated 18th February 2015 and SEZ Notification No. S.O. (E) dated 30th October 2017 issued by Ministry of Commerce and Industry (Department of Commerce), Government of India under Section 4 of the SEZ Act, 2005, subject to such conditions and exclusions as specified in the said Notifications, and as specifically delineated in the revised Map annexed as Schedule 1."

ABHIJIT DESHPANDE,
Secretary,
Maharashtra Electricity Regulatory Commission.

Mumbai,
dated 20th September 2018.

---

*Note.*—The Maharashtra Electricity Regulatory Commission (Specific Conditions of Distribution Licence applicable to M/s. Gigaplex Estate Pvt. Ltd. for IT & ITES SEZ at Airoli Knowledge Park, TTC Industrial Area, Airoli, Dist. Thane) Regulations, 2015 were notified in the *Official Gazette* on 23rd December, 2015. These were further amended by the Maharashtra Electricity Regulatory Commission (Specific Conditions of Distribution Licence applicable to M/s. Gigaplex Estate Pvt. Ltd. for IT & ITES SEZ at Airoli Knowledge Park, TTC Industrial Area, Airoli, Dist. Thane) (first Amendment) Regulations, 2017 on 3rd February, 2017.

Schedule 1




ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY I/C DIRECTOR SHRI MANOHAR SHANKAR GAIKWAD, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 EDITOR : I/C DIRECTOR SHRI MANOHAR SHANKAR GAIKWAD.